सुचेता गोखले

# परतफेड

सकाळची  नेहमीची गडबड चालू होती. माझी भाजीपोळी करून झाली आणि डबा भरून घेतला. ब्रेकफास्टही बनवला. आज केळं घालून मस्तपैकी गोडशीरा केला. माझ्या नातवाला आवडतो तसेच ऑफिसमधल्या नॅन्सीलाही आवडतो. दोन दिवसांपूर्वीच तिने मला आठवण केली होती की खूप दिवसात तू स्वीट शिरा आणला नाहीस म्हणून आजचा बेत गोड शिऱ्याचा होता. माझ्या आवडीची आकाशी रंगाची सिल्क साडी नेसली. पर्स खांद्यावर लटकवली आणि निघणार तेवढ्यात घरच्या फोनची रिंग वाजली. घरात माझ्याशिवाय कोणीच नव्हते. मी पटकन फोन उचलला. “हॅलो” पलीकडून आवाज आला “श्वेता ना तू ?” मी हो म्हणाले. फोन रोहिणीकाकूंचा होता. मी घड्याळात पाहिले. काकूंना म्हटले, “काकू मी कामावर जायला निघाले आहे. मी ऑफिसात पोचल्यावर फोन करू का?” “अगं,मी काय सांगते ते ऐक ना. माझं एक काम होतं तुझ्याकडे.” पण मी मधेच त्यांना थांबवले. ऑफिसात गेल्यावर फोन करते, मला उशीर झाला आहे  असे म्हणत  मी  फोन ठेवला. घरातून खाली आले, रस्त्यावर पटकन रिक्षा मिळेना. २-३ रिक्षा  गेल्यावर रिक्षा मिळाली. आता पोहोचेन ऑफिसात वेळेवर मी मनाशी म्हणाले. ठरवले आता असा उशीर होऊ द्यायचा नाही. सकाळी गजर झाल्यावर बोट स्नूझवर पडण्याऐवजी गजर बंद केला गेला. माझ्या लक्षात आले नाही व मला परत झोप लागली.  चक्क अर्धा तास उशीरा उठले म्हणून सगळा गोंधळ झाला.

ऑफिसात जाऊन हजेरीसाठी अंगठा मशीनवर उमटवला आणि खुर्चीत टेकले. पाणी प्यायले. नवीन आलेल्या जोशीमॅडम जरा कडकच आहेत म्हणून काळजी घेतलेली बरी. तशी कामाच्या बाबतीत तक्रारीला जागा राहू नये याची मी नेहमीच खबरदारी घेत असे. काही शंका आली तर मॅडमना विचारत होते त्यामुळे त्यांचे  माझ्याबद्दल अनुकूल मत होते. मात्र मी या गोष्टीचा गैरफायदा कधी घेतला नाही. समोरची फाईल उघडून पहायला

सुरवात केली. आज कोणती कामे करायची आहेत त्याचा मनाशी आढावा घेत मी कामाला सुरवात केली. थोड्यावेळाने शिपायाने चहा आणून दिला तेव्हा मला आठवले नॅन्सीसाठी गोड शिरा आणला आहे. मी शिपायाला तिच्या टेबलावर डबा नेऊन द्यायला सांगितले. शिपाई डबा घेऊन परत आला. आज नॅन्सी आली नव्हती. मी बरे म्हणून डबा ठेऊन दिला. दुपारी एक वाजेपर्यंत मी कामात दंग होते. जेवणाच्या सुट्टीत डबा उघडता उघडता मला रोहिणकाकूंच्या सकाळी आलेल्या फोनची आठवण झाली. अरे,असे कसे विसरलो आपण त्यांना फोन करायला? काय वाटलं असेल त्यांना? काही महत्वाचं काम असेल तर? मी तेव्हाच त्यांच्याशी बोलायला हवे होते. मी भरभर जेवले. काकू दुपारी 'आम्ही सारे खवय्ये' कार्यक्रम बघतात न चुकता हे मला माहित होते. म्हणून त्यांना फोन लावला. आधी सॉरी म्हटले व मग काय काम होते ते विचारले. पलिकडे काकू निशब्द. मी हॅलो, हॅलो म्हणतेय पण मला कोणताच प्रतिसाद मिळत नव्हता. मी त्या झोपल्या असतील असे म्हणत फोन ठेवून दिला. आता कामाला सुरवात करणार म्हणून परत एकदा रोहिणीकाकूंना फोन लावला. ५-६ वेळा रिंग झाल्यावर फोन उचलला गेला. "काकू, मी श्वेता. मगाशी फोनवर तुम्ही  काही बोलल्या नाहीत म्हणून फोन लावला. काकूंचा आवाज अगदी पुसटसा येत होता. म्हणाल्या," मला बरं वाटत नाही गं. अंग मोडून आलं आहे. मी आज जेवणही बनवलं नाही. कपभर दूध पिऊन पडून राहिले. मला कसंसंच झालं. आपण सकाळी ऑफिसात आल्यावर तरी फोन करायला हवा होता. त्यांना दवाखान्यात नेता आलं असत. मी अर्धा दिवस रजा टाकली व काकूंच्या घरी गेले. मला भीती वाटत होती, मी त्यांच्या घरी जाईस्तोवर त्यांना झोप तर लागणार नाही? मग त्यांची झोपमोड होईल.

काकू जाग्याच होत्या. मी प्रथम मऊ भात करून त्यांना जेवायला वाढले. सकाळी दूध प्यायल्यावर त्यांनी क्रोसिन घेतली होती. म्हणून ताप उतरला होता. भात पोटात गेल्यावर त्या थोड्या ताज्यातवान्या झाल्या. मग मी त्यांना स्पंजींग करून दिले. तरतरी आल्यामुळे डॉक्टरांकडे जायला नको म्हणाल्या. मी त्यांना विश्रांती घ्यायला सांगितली व रात्री मी स्वतः खिचडी आणून देईन असे सांगितले. घरी आल्यावर चहाचे आधण गॅसवर चढवले.

दुसरीकडे वरणभात कुकर मध्ये लावला. देवापुढे निरांजन लावले. तोपर्यंत पराग माझा मुलगा नातवाला -प्रियांकला पाळणाघरातून घेऊन आला. आमच्या दोघांचा चहा आणि प्रियांकचे दूध पिऊन झाल्यावर तो त्याच्या बाबाशी खेळू लागला. प्रीतीला माझ्या सुनेला आज ऑफिसातून घरी यायला उशीर होणार आहे हे ती सकाळीच सांगून गेली होती. त्यामुळे मी स्वयंपाक केला. गरम  खिचडी काकूंना देऊन घरी आले. तोपर्यंत प्रीतीही आली. गप्पा मारत आमची जेवणे झाली. पुढचे दोन दिवस मी काकूंची  फोनवरून  चौकशी करत होते. आता त्यांची तब्येत सुधारली होती.

रोजच्या धबडग्यात पुढचा आठवडाभर मला काकूंना फोन करणे जमले नाही. मग एक दिवस काकू मला त्यांच्या बिल्डिंगपाशी भेटल्या. भाजी घेऊन परत आल्या होत्या. मी त्यांच्या तब्येतीची विचारपूस  केली. म्हणाल्या हल्ली मधूनमधून असे होते. क्रोसिन घेतली की मला बरे वाटते. मग मी त्यांच्या अमेरिकेत असलेल्या मुलासुनेची चौकशी केली. मुलाच्या कानावर हे घातले का असे विचारले तर थोडं अळंटळं करून त्यांनी विषय बदलला. दुसरा काही विषय निघाला आणि आम्ही आपापल्या घरी परतलो. रात्री अंथरुणावर पडल्यावर मला मगाचेच बोलणे आठवले व काकूंनी विषय टाळलेलाही आठवला. का असे केले त्यांनी? गौरव हा त्यांचा एकुलता एक मुलगा. शिकायला अमेरिकेत गेला. तो कॉलेजात असतानाच त्याचे वडील थोड्या आजारपणाचे निमित्त होऊन गेले. तेव्हापासून काकूंनी शिक्षिकेची नोकरी सांभाळत गौरवचे शिक्षण केले. एज्युकेशन लोन काढून गौरव अमेरिकेत पुढील शिक्षणासाठी गेला. नोकरीतही मन लावून तो एकेक पुढची पायरी चढत गेला. तिथे त्याची त्याच्याच कंपनीत काम करणाऱ्या रूपाशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले व त्याचे पर्यवसान लग्न करण्यात झाले.

रूपाचे माहेर पुण्यातले. तिचे वडील एका खाजगी कंपनीत उच्च पदस्थ अधिकारी होते आणि आई एका बँकेत अधिकारी पदावर कार्यरत होती. रूपा आणि प्रसाद असे दोघे बहिणभाऊ. दोघेही हुशार. रूपा एमबीए झाली आणि प्रसाद इंजिनिअर.रूपा एका खाजगी कंपनीत नोकरीला लागली. कामात ती हुशार आणि चटपटीत होती. नवीन शिकण्याची आवड होती. एक दिवस परदेशात नोकरी करण्याची संधी तिच्याकडे चालून आली व रूपा

अमेरिकेत गौरवच्या कंपनीत रुजू झाली. नवी नोकरी,नवा देश, नवीन जग आणि नवीन शिकण्याची संधी चालून आली होती. रूपा मनोमन सुखावली. सहा महिन्यात रूपाची गौरवशी ओळख होऊन मैत्रीही झाली.

गौरव आणि रूपा यांची मैत्री होऊन दोन वर्षे झाली. त्यांनी लग्न करायचा निर्णय घेतला. तिच्या आई वडिलांची लग्नाला मान्यता होती. गौरवने एक दिवस फोन करून आईला हि बातमी सांगितली. रोहिणीकाकूंना मुलाच्या लग्नाचे वेध लागले होतेच. गौरव भारतात आला कि आपण मुली पाहून घेऊ व त्याच्या पसंतीच्या मुलीशी त्याचे लग्न लावून देऊ हि स्वप्नं ती माऊली पाहत होती. पण तेवढ्यात गौरवची हि शुभवार्ता कळल्यामुळे रोहिणीताई सुखावल्या. त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. लग्न पुण्यात करायचे ठरले. गौरवचे फारसे नातेवाईक नव्हते. जे चार होते ते लग्नात बुजल्यासारखे झाले होते. बाकी लग्न एकदम वधु पक्षाच्या प्रतिष्ठेला साजेसे धुमधडाक्यात पार पडले. लग्नाच्या दुसरया दिवशी सत्यनारायणाची पूजा करण्याचा बेत काकूंनी आखला.पण रूपाच्या वडिलांनी दुसऱ्याच दिवशी नवीन जोडप्याने हनिमूनला जावे म्हणून विमानाची तिकिटे बुक केली होती. काकूंचा बेत मनातच राहिला. नवविवाहित दहा दिवसांनी परत येणार म्हणून काकूंनी त्यानंतर सत्यनारायणाच्या पूजेचा बेत ठरवला. पूजेसाठी आईवडील आणि भाऊ गौरवच्या घरी आले. मुंबईत काकूंचा एक बीएचकेचा फ्लॅट होता. एवढे लहान घर पाहून ना रूपा खूष होती ना तिचे आईवडील. पण रूपा गौरव अमेरिकेत राहणार म्हटल्यावर त्यांनी फारशी खंत मनात बाळगली नाही. पूजेनंतर चारच दिवसांत गौरव रूपा अमेरिकेत परतले. काकू घरात एकट्याच राहिल्या. आधीही इतके दिवस त्या एकट्याच होत्या. लग्नामुळे घर भरले असे वाटू लागेपर्यंत ते रिकामे झालेही. काकूंच्या मनावर मळभ दाटले. पुढच्या वर्षी आम्ही तुलाच अमेरिकेला घेऊन जाऊ असे आश्वासन त्यांना लेकाने दिले. त्यामुळे काकू थोड्या सावरल्या. मुलंही अमेरिकेत रुजली.

आज प्रीती ऑफिसच्या कामासाठी बंगलोरला गेली. ती दुसऱ्या दिवशी रात्री परत येणार होती. तिला अधूनमधून बंगलोरला कामासाठी जावे लागे. प्रीती बुद्धिमान असून नवनवीन प्रोजेक्ट्स पार पाडण्यात चांगली तरबेज होती. प्रीतीच्या मधूनमधून बाहेरगावी

जाण्यामुळे नातवाला माझी चांगली सवय झाली होती. एकत्र कुटुंब असण्याचा हा आधार आम्हाला सगळ्यांनाच होत होता. अडीअडचणीत सगळ्यांचीच साथ होती. प्रीतीचे आईवडील पुण्यात निगडीला राहत होते. प्रीती मध्यमवर्गीय कुटुंबातली होती. वडील बँकेत ऑफिसर होते. आई गृहिणी होती. वेगवेगळ्या छंदात ती मन रमवत असे. प्रीतीच्या धाकट्या बहिणीचे प्रज्ञाचे तीन वर्षांपूर्वी लग्न झाले होते. ती आता नाशिकमध्ये राहत होती. प्रीतीच्या माहेरचे सगळे अतिशय मनमिळावू होते. आम्हां दोन्ही कुटुंबातले संबंध नेहमी जवळचे,दृढ होते. आमचे हे मुंबईतले घर लहान असले तरीही प्रीतीच्या माहेरची मंडळी आमच्याकडे अधूनमधून मुक्कामाला येत असत. तर मीही कधी प्रीतीबरोबर तिच्या माहेरी काही कारणाने जात असे. प्रीतीच्या बहिणीच्या, प्रज्ञाच्या सासरी मात्र तितकेसे मोकळे वातावरण नव्हते त्यामुळे ती फारशी माहेरी येऊ शकत नव्हती ना आमच्याकडे येऊ शकत होती. तेव्हढी एकच गोष्ट आमच्या सर्वांच्या मनाला लागून राहिली होती. दोन महिन्यांपूर्वी प्रज्ञाकडे आनंदाची बातमी आहे असे आम्हाला कळले.आम्ही सगळेच आनंदून गेलो.

प्रज्ञा बाळंतपणासाठी माहेरी पुण्यात निगडीला आली. प्रियांक मावशीचा लाडका होता आणि मावशीकडून लाड पुरवून घेण्यात तरबेज होता. प्रीतीला शनिवार रविवार ऑफिसला सुट्टी असायची. योगायोगाने प्रियांकलाही शनिवारी कसलीशी सुट्टी होती. म्हणून प्रीतीने शुक्रवारी ऑफिसमधून अर्धा दिवस सुट्टी घेतली आणि दोघे मायलेक दुपारी तीनच्या शिवनेरीने पुण्याला रवाना झाले.. प्रियांक असला कि घरात नुसती गडबड मस्ती चालू असते. आमच्याकडे एक अलिखित नियम आहे, रात्रीचे जेवण सगळ्यांनी एकत्र करायचे कारण दिवसभर सगळेच घराबाहेर असतात. दोन वर्षांपूर्वी परागचे बाबा ब्रेन ह्यामरेजने गेले. हा एकत्र जेवणाचा नियम त्यांनीच घालून दिला होता. प्रियांकचे जेवण आम्ही आधी करून घेतो म्हणजे आम्हाला निवांतपणे गप्पा मारत जेवता येते. काही महत्वाचे विषय याच ठिकाणी आम्हाला बोलता येतात.आता माझे घर आता रिकामे झाले होते.

काल प्रीती आणि प्रियांक पुण्याला गेल्यामुळे मी संध्याकाळी ऑफिसातून येताना रोहिणीकाकूंकडे त्यांना भेटायला गेले. सध्या ऑफिसात काम वाढले असल्यामुळे घरी

यायला उशीर होत नसला तरी दमून जायला होत  होतं. आज शनिवार अर्धा दिवस ऑफिस म्हणून म्हटलं काकूंना भेटून यावं. त्यांनाही बरं वाटेल आणि मलाही. उद्या सुटी असल्यामुळे कोणतीही धावपळ नव्हती. मला बघून काकू खूष झाल्या. म्हणाल्या मी पटकन चहाचे आधण ठेवते व गरमगरम पोहे करते खायला. ऑफिसातून दमून आली आहेस ना? मी नकोनको म्हणत असतानाही त्यांनी चहाचे आधण ठेऊन पोहे करायला घेतले. त्यांचा उत्साह पाहून मला इतके बरे वाटले. मी त्यांच्याकडे गेल्यामुळे थोडावेळ का होईना त्यांचा एकटेपणा कमी होणार होता. माझ्याशी किती बोलू आणि किती नको असे त्यांना झाले. खाणेपिणे होईस्तोवर आमच्या बऱ्याच गप्पा झाल्या. त्यांना म्हटलं आता मी निघते. त्यांना माझ्याशी अजून बोलायचे होते. मग मी त्यांना म्हटले,"काकू तुम्ही असं का नाही करत,मला उद्या सुट्टी आहे. प्रीती प्रियांक पुण्याला गेले आहेत. पराग आणि त्याचे दोन मित्र बाहेर कुठेतरी भेटणार आहेत. तर तुम्ही उद्या सकाळपासून दिवसभर माझ्याकडे या. आपण दोघी खाऊपिऊ ,भरपूर गप्पा मारू." काकूंना माझे म्हणणे एकदम पटले. दुसऱ्या दिवसाचा बेत ठरवून मी घरी यायला निघाले. घरासमोरच्या दुकानातून काही जिन्नस घेतले. उद्याचा दिवस खास काकूंचा होता ना म्हणून. दुसरा दिवस उजाडला. काकू येणार म्हणून माझ्या अंगात उत्साह संचारला होता.काकूंच्या आवडीचे सगळे पदार्थ करायचे ठरवले होते. सकाळी ब्रेकफास्टला इडली चटणी सांबार केले. लुसलुशीत इडल्या वाफाळलेल्या सांबारासोबत आणि चविष्ट चटणीबरोबर खाताना काकू खूष झाल्या होत्या. नंतर मस्त वाफाळता चहा घेतला. दुपारी जेवायला टोमॅटोचे सार आणि भात, मटकीची उसळ,कोथिंबिरीच्या वड्या,काकडीची कोशिंबीर, गरम पुऱ्या आणि गुलाबजाम तेवढे विकत आणले. सगळी तयारी काल रात्रीपासून केली होती त्यामुळे आज कामं पटपट आवरली. गप्पा मारायला खूप अवसर मिळाला.

गप्पा मारताना मला मधेमधे जाणवत होते की काकू कितीही हसतमुखाने वावरत असल्या तरी थोडासा खिन्नपणा त्यात जाणवत होताच. मी म्हटलं काकूंना, "तुमच्या वागण्यात थोडासा खिन्नपणा जाणवतोय. तुम्हाला मला काही सांगायचं आहे का? तुम्ही ते मला कसं सांगावं या पेचात दिसताहात. काय झालं काकू? तुम्हाला काही त्रास होतोय का?

बरं वाटत नाही  की कोणी काही बोललं?" तोपर्यंत काकूंच्या डोळ्यात ढग गोळा व्हायला लागलेले मला दिसले. डोळ्यात टिपं जमा झाली. मी दिलेल्या ग्लासातले पाणी प्यायल्या व म्हणाल्या,"किती दिवस झाले गौरवचा काही फोन आला नाही. पूर्वी दर पंधरा दिवसांनी फोन करायचा. मग हळूहळू महिना दोन महिने व्हायला लागले. आता साडेतीन महिने झाले. त्याचा फोनच नाही. मला खूप काळजी वाटतेय गं. सगळे ठीक असतील ना? काही अडचणीत तर नसेल ना तो? सुरवातीला रूपा बोलायची माझ्याशी. तो व्हिडीओ कॉल करायचा. त्यांना समोर बघितल्यावर मला खूप बरं वाटायचं. आताशा ते समोरासमोर बोलत नाहीत. नुसता व्हॉइसकॉल करतो.रूपा काहीतरी कामात आहे असे सांगतो. आर्यनला, माझ्या नातवाला तर मी गेल्या ७-८ महिन्यांत पाहिलंही नाही. तो झोपलाय, आंघोळ करतोय असं सांगतो. मला ते टाळताहेत हि भावना हल्ली मनात फेर धरू लागली आहे. याच विचाराने मग मला जेवण जात नाही. मधेच कधीकधी चक्करल्यासारखे वाटते." मला हे सगळं ऐकताना कसंतरी झालं. ज्या आईने एव्हढ्या कष्टाने या मुलाला वाढवले आणि तीच त्याला नकोशी झाली? मी खूप बेचैन झाले. थोड्यावेळाने काकू घरी गेल्या. रात्री कितीतरी वेळ या विचाराने मला झोपच लागली नाही. मला त्या माऊलीविषयी विलक्षण कळवळा वाटला.

पुढच्या आठवड्यात मी काकूंकडे जायचे ठरवले. लॅपटॉप घेऊन मी त्यांच्याकडे गेले. लॅपटॉपवरून मी गौरवला व्हिडीओ कॉल लावला. तो लगेच स्क्रीनवर दिसायला लागला. त्याची खुशाली विचारून त्याला म्हटलं, "आईला बोलायचे आहे तुझ्याशी म्हणून कॉल लावला." काकूंच्या डोळ्यांतून मुलाला पाहिल्यावर अश्रू ओघळले. डोळे पुसत त्या मुलाची, सुनेची, नातवाची चौकशी करत राहिल्या. काकू मला बोलल्याप्रमाणे त्याने मुलाची व बायकोची काहीतरी कारणे सांगितली. पाच मिनिटांत कॉल संपला. त्याला काही कामे आहेत असे म्हणाला. काकूंना मी डोळ्यांनी खुणावले, राहू दे म्हटलं. पुन्हा पुढच्या महिन्यात कॉल करूया असे काकूंना सांगितले. पुढच्या महिन्याची त्या वाट पाहू लागल्या. मग कॉल करण्याचा दिवस आला. मी लॅपटॉप घेऊन काकूंकडे गेले. त्या चांगली साडी नेसून तयार होऊन बसल्या होत्या. मी कॉल चालू केला. स्क्रीनसमोर फक्त काकू होत्या. मी त्याच

खोलीत पण दुसरीकडे, गौरवला दिसणार नाही अशा ठिकाणी बसले. म्हटलं त्याला संकोच वाटायला नको. आज गौरवच्या बोलण्यात तुटकपणा जाणवत होता. काकूंनी त्याला विचारले की “आता तू भारतात कधी येशील? खूप दिवसांत (वर्षांत?) तुम्हा तिघांना पहिले नाही,भेटले नाही. त्यावर तो म्हणाला,”त्यात काय भेटायचे? तू अशी व्हिडीओ कॉलवर भेटतेस की अधूनमधून. तू अशी सारखी  रडतेस आणि आम्ही तिकडे यावे म्हणून गळ घालतेस हेच आम्हा दोघांना आवडत नाही.” काकू म्हणाल्या, “अरे रूपाच्या घरच्यांनाही वाटत असेलना तुम्हाला भेटावं म्हणून. मग काही दिवस इकडे रहा आणि काही दिवस तिच्या माहेरी रहा.” गौरवने ह्यावर उत्तर द्यायचे टाळले व कॉल बंद केला. डोळे पुसण्याशिवाय काकूंकडे दुसरा कोणताच मार्ग नव्हता.

प्रीतीची बहीण प्रज्ञा बाळंतीण झाली. तिने एका गोंडस मुलीला जन्म दिला. सगळे खूष  झाले. तिच्या सासरचे थोडे नाराज होते. पण मग इतरांच्या आनंदात हो ला हो म्हणत ‘पहिली बेटी धनाची पेटी’ हे त्यांनी मान्य केले. दोन महिन्यांनी बारसे करायचे ठरले.आम्ही सगळेच जाणार होतो. दोन दिवस राहून परतणार होतो. बारशाच्या दुसऱ्या दिवशी काहीतरी खरेदी करण्यासाठी म्हणून मी व प्रीती पुण्यात आलो. प्रीतीला म्हटलं माझी कॉलेजपासूनची एक मैत्रीण इथे जवळच राहाते. आपण जाऊन भेटूया का तिला? प्रीती हो म्हणाली. मैत्रिणीच्या घराजवळ असतांना मला एक साधारण ओळखीचा चेहरा असलेला माणूस दिसला. त्याला कुठेतरी बघितल्यासारखे वाटत होते. मी थोडी भरभर पाऊले उचलली. प्रीती माझ्या मागोमाग आली. तोपर्यंत तो  मैत्रिणीच्या बिल्डिंगमध्ये शिरलादेखील. “काय  झालं आई? कोण होता तो?” प्रीती विचारत होती. मी म्हटले,मला भास झाला कि काय ते कळत नाही. तो रोहिणीकाकूंच्या गौरवसारखा वाटला. कळत नाही. तो तर अमेरिकेत असतो. मग तसाच भासणारा हा कोण? माझ्या मनात शंकांनी जाळं विणलं. आम्ही मैत्रिणीकडे आलो. ख्यालीखुशाली विचारतानाच माझ्या मनात विचार आला, मैत्रिणीकडे सहज चौकशी करावी का त्याच्याबद्दल? मी तिच्याजवळ त्याचे वर्णन केले व नाव सांगितले. त्याबरोबर ती म्हणाली,“अगं हो ,पाचव्या मजल्यावर राहतात.” मी म्हटलं “ते अमेरिकेत होते ना?” तर म्हणाली,“दोन अडीच  वर्षांपूर्वी ते इथे राहायला आले.

तिच्या वडिलांनी म्हणे तिच्यासाठी इथे ब्लॉक घेऊन ठेवला होता. त्यांना हार्टअटॅक आल्यामुळे त्यांनी लेकी जावयाला कायमचं इथे बोलावून घेतले. ते दोघे नोकरी सोडून कायमचेच इथे राहायला आले. इथे दोघेही आपापला स्वतंत्र व्यवसाय करतात. तिची आई तिच्या मुलाला सांभाळते." मैत्रिणीने एका दमात सगळे सांगून टाकले. मग तिच्या मनात प्रश्न आला मी का विचारते त्याच्याबद्दल? प्रीती आणि मी एकमेकींकडे पाहात राहिलो. मैत्रिणीच्या लक्षात आले की काहीतरी विपरीत घडले आहे. तिने मला तसे विचारलेदेखील. मी म्हटले आमच्या ओळखीतले आहेत त्यांचा हा मुलगा. आज अचानक दिसला म्हणून विचारले.

दुपारच्या चार वाजताच्या शिवनेरीचे बुकिंग झाले होते. जेवण आटोपून बॅग आवरली व आम्ही निघालो. परतीच्या प्रवासात मला डोळ्यांपुढे गौरवच दिसत होता. त्यादिवशी व्हिडीओ कॉलवरून आईशी तुसडेपणाने बोलणारा, कॉलेजमधला ,अमेरिकेला जाण्याची संधी मिळाली हे सांगायला आलेला गौरव; किती बदलला हा मुलगा ? आपली आई आपल्या मुला-सुनेच्या, नातवाच्या आठवणीने झुरते आहे त्याचे ह्याला काहीच नाही. पैसेवाली श्रीमंत बायको त्याला मिळाली होती. सासऱ्यांनी पुण्यासारख्या शहरात उच्चभ्रू वस्तीत ब्लॉक घेऊन दिला. साहजिकच सामान्य कुटुंबातली आई त्याला आणि त्याच्या बायकोला कशी पटणार होती....मी अजूनही त्या धक्क्यातून सावरले नव्हते. काकूंना कसे सांगू की ज्याची तुम्ही तळमळीने वाट पाहत आहात तो तर इथेच, तुमच्याजवळ पुण्यातच आहे. पण मनाने मात्र तो तुमच्यापासून कोसो दूर गेला आहे.